| | |
|---|---|
| दाखल तारीख | १३.०८.२०१९ |
| नोंदणी तारीख | १९.०८.२०१९ |
| निकाल तारीख | १०.०३.२०२६. |
| कालावधी | वर्ष महिना दिवस |
| | **०६ ०६ २७** |

**मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर यांचे न्यायालयात**

**(पीठासीन अधिकारी एम. एम. गादिया)**

**नियमित फौजदारी खटला क्र. ६५०/२०१९**

**CNR No. MHKO030062602019** **नि. ६०/ब.**

**गुन्हा क्रमांक २४६/२०१७.**

**महाराष्ट्र शासन तर्फे शाहूपुरी पोलीस ठाणे, कोल्हापूर.** .. **अभियोग पक्ष**

***विरुध्द***

**प्रशांत श्रीकांत चौगले,**
वय : २७ वर्षे, धंदा : शिक्षण,
रा. चावडी गल्ली, वडणगे, ता. करवीर,
जि. कोल्हापूर. **..आरोपी**

---

अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता – श्री. ए. एन. डोईफोडे.
आरोपीतर्फे विधीज्ञ – श्री. के. पी.सावंत.

---

## न्यायनिर्णय

( दिनांक १०.०३.२०२६ )

प्रस्तुत खटल्यात आरोपीविरुध्द माहिती तंत्रज्ञान अधिनियम,२००० मधील कलम ४३(अ),४३(ज) व सह कलम ६६ तसेच ६६–क व ६६–ड तसेच भारतीय दंड संहिता, १८६० मधील कलम ३८४ व ५०७ खालील गुन्ह्यांसाठी दोषारोपपत्र दाखल करण्यात आलेले आहे.

**०२.**अभियोगपक्षाची थोडक्यात हकिकत अशी की, दि.२६.०५.२०१७ ते २२.०६.२०१७ या दरम्यान फिर्यादी नामे सृष्टी मिलिंद पडवळे व साक्षीदार श्रध्दा मनोज मुगडे यांचे फेसबुक खाते आरोपीने हॅक करुन त्यांचे पासवर्ड व ई–मेल बदलले, तसेच सदर पासवर्ड व ई–मेल देणेसाठी त्यांच्याकडे पैशाची मागणी केली. सदर घटनेबाबत फिर्यादीने दि.२३.०६.२०१७ रोजी शाहुपूरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. सदर फिर्यादीच्या अनुषंगाने गुन्हा क्र.२४६/२०१७ नोंदविण्यात येऊन, तपासादरम्यान, आरोपी निष्पण झालेने, त्यास अटक करण्यात येऊन, त्याच्याविरुध्द दोषारोपपत्र दाखल करण्यात आले.

**०३.**माझ्या विव्दान पुर्वाधिका–यांनी आरोपीविरुध्द दोषारोप(नि.१३) तयार केला आहे, व सदर दोषारोपातील सर्व मजकूर सदर आरोपीस त्याच्या मायबोलीत वाचुन व समजावुन सांगणेत आला असता, त्याने गुन्हा नाकबुल करुन चौकशीची मागणी केली. सदर आरोपीने आपल्या बचावात अभियोगपक्षाची सर्व हकिकत नाकारुन, त्यास खोट्या गुन्ह्यात गोवण्यात आलेचे नमूद केले आहे.

**०४.**वादप्रश्न व त्यावरील माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहेत,

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपीने फिर्यादी व इतर साक्षीदारांचे फेसबुक अकौंट त्याच्या परवानगीशिवाय लबाडीच्या हेतूने पाहिले किंवा त्यामध्ये ॲक्सेस प्राप्त केला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **... नाही.** |
| २. | आरोपीने फिर्यादी व इतर साक्षीदारांच्या फेसबुकचा पासवर्ड बदलला किंवा तो लपविला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **... नाही.** |
| ३ | आरोपीने फिर्यादी व इतर साक्षीदारांच्या फेसबुकचा पासवर्ड व विशिष्ट ओळखीबाबतच्या बाबींचा लबाडीच्या हेतूने वापर करुन आपली ओळख लपविली, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **... नाही.** |
| ४. | आरोपीने माहिती तंत्रज्ञान वा संगणक या माध्यमांचा वापर करुन व आपली ओळख लवपून फिर्यादी व साक्षीदारांची ठकवणूक केली, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **... नाही.** |
| ५. | आरोपीने बलादग्रहण केले, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **... नाही.** |
| ६. | आरोपीने निनावी संदेशाद्वारे धाकधपटशाचा वापर केला, हे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | **... नाही.** |

७. काय आदेश ? **आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले आहे.**

## <u>कारणमीमांसा</u>

**०५.**दोन्ही बाजुंच्या विद्वान वकिलांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. आपल्या हकिकतीच्या पृष्ठर्थ, अभियोगपक्षाने फिर्यादी, श्रध्दा(अ.सा.२), प्रितम(अ.सा.३), व तपासी अंमलदार मोरे(अ.सा.४) यांच्या साक्षी (अनुक्रमे नि.१८, २०, २१ व २४) घेतल्या आहेत. अभियोगपक्षाने दिनांक २३.०६.२०१७ रोजीची फिर्याद(नि.१९) व इतर कागदपत्रांचा आधार घेतला आहे.

**<u>वादप्रश्न क्र.१ ते ६ करिता,</u>**

**०६.**सदर वादप्रश्न हे परस्परांशी निगडीत असल्यामुळे, सदर वादप्रश्नांचे विश्लेषण सोईसाठी एकत्रीतपणे करण्यात येत आहे. फिर्यादीने आपल्या साक्षीत(नि.१८) असे नमुद केले आहे की, सन २०१७ मध्ये तिचे सृष्टी पडवळे या नावाने फेसबुक अकौंट होते. दि.२६.०५.२०१७ रोजी तीच्या भ्रमणध्वनीवरील फेसबुकवर नोटीफिकेशन प्राप्त झाले. म्हणून तीने तीच्या फेसबुक अकौंटवर लॉग–इन करणेचा प्रयत्न केला, परंतू लॉग–इनमध्ये अडथळा निर्माण होत होता. तीने पासवर्डही बदलून पाहिला, तसेच नवीन फेसबुक अकौंट चालू केले, परंतू त्याचा उपयोग झाला नाही. तीस नवीन अकौंटवरही नवीन अकौंटप्रमाणेच संदेश प्राप्त झाला. त्यामुळे तीचे फेसबुक अकौंट खाते कोणीतरी हॅक केल्याचे तीच्या लक्षात आले. म्हणून तीने सदर संदेशास प्रतिसाद दिला असता, तीस संदेश प्राप्त झाला की, तीचे फेसबुक खाते हॅक करण्यात आलेले आहे, व पासवर्ड हवा असल्यास पेटीएम वरुन रु.५००/–पाठवावे लागतील. सदर भ्रमणध्वनी क्रमांक तीच्या लक्षात नाही.

म्हणून तीने फिर्याद(नि.१९) दाखल केली. तीच्या जुन्या फेसबुक अकौंटवरुन तीचे नातेवाईक प्रितम पाटील व पुष्कराज शिर्के यांना संदेश प्राप्त झाले व त्यामध्ये शालेय कारणासाठी अनुक्रमे रु.५००/- व १०००/- या रक्कमेची मागणी करण्यात आली. याप्रमाणे तीची मैत्रीण श्रध्दा मुगडे(अ.सा.२) हिचेही फेसबुक अकौंट हॅक करण्यात आलेले होते. तीस पोलिसांकडून आरोपीने सदर कृत्य केलेची माहिती मिळाली.

**०७.**श्रध्दा(अ.सा.२) हिने आपल्या साक्षीत(नि.२०) असे नमुद केले आहे की, दि.२०.०५.२०१७ रोजी फिर्यादीचा तीस फेसबुकवर 'हाय' म्हणून संदेश आला. ती त्यावेळी तिच्याशी चॅट करत होती व त्यावेळी तीने तीस फेसबुकवर एक लिंक पाठविली व महाविद्यालयाच्या कामासाठी तीच्या तपशीलाची मागणी केली. तीने सदर लिंक ओपन केली परंतू त्यामध्ये तपशील भरला गेला नाही. तीच्या फ्रेंड रिक्वेस्टवरुन दोन ते तीन लोकांना "मला पैशाची गरज आहे, पैसे पाठवा" असे संदेश केले होते. तीच्या फेसबुक खात्यात तीस लॉग-इन करता येत नव्हते. म्हणून तीने पोलिस उपअधीक्षक, कोल्हापूर यांचेकडे तक्रार केली असता, त्यांनी तीचे फेसबुक खाते हॅक झालेचे सांगीतले. त्यावेळी फिर्यादी ही हजर होती व तीच्या फेसबुक खात्यावरील आलेले अश्लील छायाचित्रे व पैशाची मागणी करणारे संदेश तीने तीस दाखविली. तीस पोलिसांकडून आरोपीने सदर कृत्य केलेची माहिती मिळाली.

**०८.**फिर्यादी व श्रध्दा(अ.सा.२) यांनी आप-आपल्या साक्षीत(अनुक्रमे नि.१८ व २०), त्यांच्या भ्रमणध्वनीचा क्रमांक, ई.एम.आय. क्रमांक वा इतर कोणतेही वर्णन नमुद केलेले नाही. सदर साक्षीदारांनी त्यांच्या फेसबुक खात्याच्या पासवर्डबाबत काहीही नमुद केलेले नाही. त्यांनी पासवर्ड हवा असल्यास पैशाची मागणी करणारे संदेश त्यांना कधी प्राप्त झालेले होते, याचा कोणताही उल्लेख केलेला नाही. प्रितम (अ.सा.३) याने आपल्या साक्षीत(नि.२१) अभियोगपक्षास साथ दिलेली नाही.

सदर साक्षीदाराचा अभियोगपक्षातर्फे उलटतपास घेण्यात आला परंतू त्यातून काहीही निष्पण झालेले नाही. तपासी अंमलदार मोरे(अ.सा.४) यांनी प्रस्तुत गुन्हयाच्या तपासादरम्यान फेसबुक व पेटीएम यांना केलेल्या पत्र व्यवहाराबाबत व तपासाअंती दोषारोपपत्र दाखल केलेबाबत आपल्या साक्षीत(नि.२४) नमुद केले आहे.

**०९.**प्रस्तुत गुन्हा हा माहिती तंत्रज्ञानामधील संवादाच्या माध्यमांवर आधारीत आहे. असे असतानाही अभियोगपक्षाने ज्या सदर माध्यमांचा संवादासाठी वापर करण्यात आला, ती माध्यमे न्यायालयासमोर हजर केलेली नाही. सदर संवादाबाबत केवळ झेरॉक्सप्रती दाखल करण्यात आलेल्या आहेत परंतू त्याबाबत पुरावा कायदा, १८७२ मधील कलम ६५-ब नुसार दुय्यम पुराव्याच्या सिध्दतेबाबत कोणतेही प्रमाणपत्र दाखल करण्यात आलेले नाही. माहिती तंत्रज्ञान माध्यमाआधारे प्रस्तुत कथीत गुन्ह्याबाबत योग्य व कायद्यानुसार स्विकारहार्य पुरावा न्यायालयासमोर आणण्यात आलेला नाही. आरोपीने ज्या माहिती तंत्रज्ञान माध्यमांद्वारे सदरची कृती केली, त्या कोणत्याही माध्यमाचा कोणताही तपशील न्यायालयासमोर आलेला नाही. त्यामुळे अभियोगपक्षाच्या शाब्दीक पुराव्यास कोणतेही महत्व देता येत नाही. एकंदरीतच अभियोगपक्षाची सर्व हकीकत ही अविश्वसनीय अशी आहे. परिणामतः आरोपीने फिर्यादी व अभियोगपक्ष साक्षीदारांच्या फेसबुक खात्यात विनासंमती, लबाडीने प्रवेश प्राप्त केला, सदर खात्यांचा त्याने पासवर्ड बदलला किंवा लपविला, त्याची विशिष्ट ओळख लपविली, तोतयागिरी करुन त्यांची ठकवणूक केली, बलादग्रहण केले किंवा फौजदारी पात्र धाकधपटशा दिला, हे विश्वनीयरित्या शाबीत झालेले नाही. परिणामतः आरोपीविरुध्दचे माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० मधील कलम ४३(अ), ४३(ज) व सह कलम ६६ तसेच ६६-क व ६६-ड तसेच भारतीय दंड संहिता १८६०, मधील कलम ३८४ व ५०७ खालील गुन्हे शाबीत झालेले नाहीत. म्हणून वादप्रश्न क्र.१ ते ६ चे निष्कर्ष नकारार्थी असे आहेत.

**<u>वादप्रश्न क्र.७ बाबत</u> :-**

**१०.**मी वादप्रश्न क्र.१ ते ६ ला दिलेल्या नकारार्थी निष्कर्षांचा विचार करता, आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. परिणामतः वादप्रश्न क्र.७ च्या निष्कर्षादाखल, मी खालील आदेश पारित करित आहे,

**<u>आदेश</u>**

१. आरोपीस माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० मधील कलम ४३(अ),४३(ज) व सह कलम ६६ तसेच ६६-क व ६६-ड तसेच भारतीय दंड संहिता १८६०,मधील कलम ३८४ व ५०७ खालील गुन्ह्यांमधुन फौजदारी प्रक्रिया संहीता, १९७३ मधील कलम २४८(१) नुसार निर्दोष मुक्त करण्यात आले आहे.

२. आरोपीचा जामिनकतबा रद्द करण्यात येवुन त्यास स्वातंत्र्य बहाल करण्यात आले आहे.

Digitally signed by MAHAVEER MOTICHAND GADIYA
Date: 2026.03.11 16:36:57 +0530

कोल्हापूर. **(एम. एम. गादिया)**
दिनांकः १०.०३.२०२६. मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर.

## खटल्याचा सारांश

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडलेली तारीख | २६.०५.२०१७ ते २२.०६.२०१७ |
| २. | प्रथम खबर | २३.०६.२०१७ |
| ३. | दोषारोप/ पत्र दाखल तारीख | १९.०८.२०१९ |
| ४. | दोषारोप तारीख | २०.११.२०१९ |
| ५. | पुरावा सुरु झालेची तारीख | ०४.०७.२०२२ |
| ६. | कोणत्या तारखेला निकालासाठी ठेवले | १०.०३.२०२६ |
| ७. | निकाल तारीख | १०.०३.२०२६ |
| ८. | शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | नाही. |

## आरोपी विषयी माहिती

| अ. क्र. | आरोपींची नावे | अटक तारीख | जामीनावर सुटलेली तारीख | केलेले गुन्हे | निर्दोष किंवा शिक्षा | दिलेली शिक्षा | फौजदारी दंड संहितेच्या कलम ४२८ साठी खटल्यादरम्यान ताब्यात घेतलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | प्रशांत श्रीकांत चौगले | -- | १८.१०.२०१९ | माहिती तंत्रज्ञान अधिनियम,२००० मधील कलम ४३(अ),४३(ज) व सह कलम ६६ तसेच ६६क व ६६ड तसेच भारतीय दंड संहिता १८६०,मधील कलम ३८४ व ५०७ | निर्दोष मुक्तता | ... | .... |

नि. ६०

## फिर्यादी/बचाव/ न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**(अ) – अभियोग पक्षातर्फे साक्षी यादी –**

| अ.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | सृष्टी मिलींद पडवळे(अ.सा.१) | फिर्यादी(नि.१८) |
| २. | श्रध्दा मनोज मुगडे(अ.सा.२) | साक्षीदार(नि.२०) |
| ३. | प्रितम राजेंद्र पाटील(अ.सा.३) | साक्षीदार(नि.२१) |
| ४. | संजय शिवाजीराव मोरे(अ.सा.४) | तपासी अमंलदार(नि.२४) |

(ब) – बचाव पक्षातर्फे साक्षीदार – निरंक

(क) – न्यायालया तर्फे साक्षीदार – निरंक

## फिर्यादी/बचाव/ न्यायालयीन निशाणी क्रमांक –

(अ) – अभियोग पक्षातर्फे निशाणी – निरंक

(ब) – बचाव पक्षातर्फे निशाणी – निरंक

(क) – न्यायालयातर्फे निशाणी – निरंक

(ड) – भौतिक वस्तू – निरंक

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by MAHAVEER MOTICHAND GADIYA
Date: 2026.03.11 16:37:02 +0530

कोल्हापूर.                (एम. एम. गादिया)

दिनांकः १०.०३.२०२६.        मुख्य न्यायदंडाधिकारी, कोल्हापूर.